नि.दि.दा.क्र. १०२/२०२२
रामेश्वर वि. कूसूम,

<u>नि.क्र. १८ वरील आदेश</u>
(दि.१८.०१.२०२४)

१. वादीने सदरचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरूस्तीकरिता दिला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने दाव्यासोबत निशाणी ५ हा तात्पूरते मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्ज कलम ११ मध्ये अनावधानाने हिस्सा असा शब्दप्रयोग टाईप झालेला असून सोबतच अर्जाचे मजकूर कलम ११ मध्ये अनावधानाने हिश्याने अनूषंगाने मजकूर टाईप झालेला आहे, वास्तविक वादीचा दावा हा मालकी हक्काचा आहे, त्यामुळे वादीला दाव्याचे दावा कलम १० मध्ये शेवटी व निशाणी ५ मधील मजकूर कलम ११ मधील मजकूर अर्जदाराचे अर्जास सूयोग्य असे कारण आहे, या वाक्यानंतर आलेला संपूर्ण मजकूर वगळून/डिलीट करून अर्जात नमुद मजकूर समाविष्ठ करणे आहे. करिता अर्ज असे.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे देऊन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रकरण हे दि.१६.०९.२०२२ रोजी दाखल असून निशाणी ५ आहे. स्वतः वादीने मा. एस.डी.ओ. साहेब सिंदखेडराजा यांचा आदेश पारित झाले नंतर प्रकरण दाखल केले. आता त्या निकलावर मा. अप्पर जिल्हाधिकारी बुलडाणा यांचा आदेश वादीचे एकटाच रचला आहे. तरी वादी दाव्यात दूरूस्ती करू बघत आहे. महसूल न्यायालयातील दोन्ही पक्षाच्या संघर्ष सूरूच राहिल. वादी केवळ प्रकरण प्रलंबित ठेवणे करीता असे अर्ज देत आहे. तरी अर्ज खारीज व्हावा. मंजुर झाल्यास ५०००/- रूपये खर्च वादीने प्रतिवादीस देणेचा आदेश व्हावा.

४. अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. मुळचा दावा हा खरेदीखत बंधनकार नाही हे जाहीर होऊन मिळणेसाठी तसेच मालकी हक्क जाहीर होऊन कायम मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यामध्ये वादीने निशाणी ५ कडे तात्पूरता मनाई हुकूम मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. दाव्याची स्थीती अद्याप तजविजीकरिता आहे. सदर प्रकरणात अद्याप मुद्दे काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, दाव्याचे कामकाज चौकशीस नाही. तरी दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ या तरतुदीचा विचार करता मागितलेल्या दूरूस्तीने दाव्याचे कोणत्याह प्रकारे स्वरूप व मागणी मागीतलेल्या दूरूस्तीप्रमाणे दूरूस्ती केल्यास बदलत नाही. सदर अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचा कोणताही पूर्वग्रह दोषीत असा अन्याय होणार नाही. वादीने सदर

दावा २०२२ मध्ये दाखल केला असून सदरचा अर्ज हा २०२३ मध्ये दाखल केला आहे. प्रतिवादीने म्हणणे देखिल तेव्हाच दिले आहे. त्यामुळे, निश्चीतच सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य असे होणार आहे. करिता अर्जाच्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे :-

आदेश

१. अर्ज नि.क्र. १८ हा मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने दाव्यामध्ये दूरूस्ती करून १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती प्रती दाखल कराव्यात.

स्वा/-

दि.१८.०१.२०२४.

शैलेश यु. कंठे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देऊळगावराजा.

रुपेश अशोक दांडगे,
लघुलेखक.